| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी – 411 018. करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| परिपत्रक स्वरुप | अवैध बांधकाम शास्ती कर आकारणीबाबत |
| परिपत्रक क्रमांक | कर/मुख्य/5/कावि/ 597 /2018, दिनांक 17/ 10/2018 |
| विषय | महानगरपालिका क्षेत्रातील निवासी अनाधिकृत बांधकामांवर आकारावयाचे शास्तीबाबत |
| अंमलबजावणी कालावधी | दिनांक 04/01/2008 पासून |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी व वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | 1. नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/ प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017<br>2. नगरविकास विभागाकडील पत्र क्रमांक संकीर्ण-2015/ प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 28 फेब्रुवारी 2017<br>3. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार असाधारण क्रमांक 86 दिनांक 10/08/2018 |

परिपत्रक,

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 267अ मधील तरतूदीनुसार महापालिका हद्दीतील दिनांक 04/01/2008 रोजीचे व त्यानंतरचे अवैध बांधकामांना देय मालमत्ता करांचे दुपटी इतकी अवैध बांधकाम शास्ती सन 2012-2013 पासूनं आकारणी करुन वसूल करणेत येत आहे.

नगरविकास विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-2015/प्र.क्र.305/नवि-20, दिनांक 11 जानेवारी 2017 रोजीचा शासन निर्णय पारित केला असून त्यानुसार अवैध बांधकामांचे शास्ती कर आकारणीबाबत खालीलप्रमाणे अंमलबजावणी दिनांक 01/04/2017 पासून करणेत येत आहे.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| 1 | 600 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. |
| 2 | 601 ते 1000 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या 50% दराने शास्ती आकारण्यात यावी |
| 3 | 1001 चौरस फूटा पुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी (सध्याचे दराने) |

ज्याअर्थी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार असाधारण क्रमांक 86 दिनांक 10/08/2018 मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 267 अ मधील, पहिल्या परंतूकानंतर पुढील परंतूक जादा दाखल करणेत आले असल्याने महापालिका हद्दीतील अधिनियम आहे. "या पोट कलमान्वये महानगरपालिकेने निश्चित केलेले दर, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपुर शहर महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी

(सुधारणा) अधिनियम 2007 याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून म्हणजेच 4 जानेवारी 2008 पासून अंमलात आली आहे."

1. त्याअर्थी सदर शासन राजपत्राचे आधारे पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील दिनांक 04/01/2008 रोजीचे व त्यानंतरचे निवासी अवैध बांधकामांना, खाली नमूद केलेल्या क्षेत्रफळाप्रमाणे अवैध बांधकाम शास्ती आकारणेत यावी.

| अ.क्र. | निवासी बांधकामाचे क्षेत्रफळ | आकारावयाच्या शास्तीचा दर |
|---|---|---|
| 1 | 600 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | शास्तीची आकारणी करण्यात येऊ नये. |
| 2 | 601 ते 1000 चौरस फूटापर्यंतचे निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या 50% दराने शास्ती आकारण्यात यावी |
| 3 | 1001 चौरस फूटा पुढील निवासी बांधकाम | प्रतिवर्षी मालमत्ता कराच्या दुप्पट दराने शास्ती आकारण्यात यावी. |

2. मिळकतकर वसूलीकामी सुरु असलेली प्रचलित संगणक प्रणाली व वसूली पध्दत उक्तप्रमाणे ठेवणेत यावी.
3. सदर परिपत्रकांची अंमलबजावणी दि.04/01/2008 पासून करणेत यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411018.

प्रति,

1. माहिती व तंत्रज्ञान विभाग / प्रॉबिटी सॉफ्ट प्रा.लि., / बिल क्लाऊड

   2/- उक्त परिपत्रकानुसार मिळकत कर संगणक प्रणालीमध्ये तात्काळ आवश्यक ते बदल करावेत.

2. प्रशासन अधिकारी / सहाय्यक मंडलाधिकारी

   ------------------------- विभागीय कार्यालय